

ई साहित्य प्रतिष्ठान
विक्रमादित्य







माझे वडील १९९९ साली वारले. त्यांना क्रिकेटची आवड नव्हती. अजिबातच नव्हती. ते एक लेखक आणि एक कवी होते. ते मराठी, माझी मायबोली तिथल्याच एका कॉलेजात शिकवत. पण माझ्यातल्या सुप्त गुणांना त्यांनी ओळखलं. त्यांनी मला प्रोत्साहन दिलं आणि आईला म्हणाले की “माझा याच्यावर पूर्ण विश्वास आहे”. कदाचित हा उलट्या मानसशास्त्राचा भाग असेल, पण मोठा होता होता मलाही त्यांच्या विश्वासाला पात्र ठरणं हे महत्त्वाचं वाटू लागलं. मी शॉर्टकट्स घेऊ नयेत हे एक आणि जीवनात चढ उतार येतच रहाणार हे दुसरे तत्त्व त्यांनी माझ्यावर मनावर बिंबवलं. सदा खेळत रहाण्याचा सल्ला दिला. माझ्या आईवडलांनी मला आयुष्याचा प्रत्येक दिवस विश्वास आणि सन्मानाने जगाअयला शिकवलं. जेव्हा क्रिकेट आणि पुढचं शिक्षण यांत निवड करण्याची वेळ आली तेव्हा ते म्हणाले “ तुला क्रिकेट चांगलं जमतं. ते तुझं पहिलं प्रेम आहे. जा बेटा, क्रिकेट खेळ”.

**मी जेव्हा सोळाव्या वर्षी भारतीय टीमच्या वतीने खेळायला लागलो तेव्हा अर्थातच सर्वाधिक आनंद माझ्या आईवडलांना झाला.**

माझ्या मोठ्या बहिणीने काश्मीरहून येताना माझ्यासाठी एक विलो लाकडाची छान बॅट आणली होती. नंतरच्या माझ्या आयुष्यात खुप भारी बॅट्स आल्या, पण माझ्यासाठी ती पहिली बॅट म्हणजे सुवर्ण भेट होती. मला तेव्हा भास व्हायचे  की मी भारतासाठी खेळतोय, सिक्सर आणि फ़ोर मारतोय आणि लोक मैदान दणाणून सोडताहेत.


**ती  बॅट मोडेपर्यंत मी वापरली.**







जॉन मॅकेन्रोचा मी एकटाच सपोर्टर होतो. सगळे मला मॅक म्हणत कारण मी तशाच स्टाईलमध्ये वावरायचो. वडलांकडे हट्ट करून मी त्याच्यासारखे हेडबॅंड आणि स्वेटबॅंड आणवले आणि त्याच्यासारखे केसही वाढवले. माझे त्या काळचे फ़ोटो बघाल तर विश्वास ठेवणार नाही. खूप खोडकर होतो मी. अतिशय त्रासदायक. मला सांभाळायला एक दाई होती आणि तिला मी चौवीस तास पळवत असे कारण मला घरात जायला आवडतच नसे.



निदान माझ्याबद्दल तर मी सांगेन, खरी **मॅच सुरू होण्याच्या खूप पुर्वीच ती सुरू झालेली असते.**










हा विजय फ़ार मोठा आहे कारण वेगवेगळया खेळाडूंचं यात योगदान आहे.







पाकिस्तानला हरवण्यात एक विशेष आनंद आहे कारण एकतर ती एक टफ़ टीम आहे, आणि दुसरं आमचा **पाकिस्तानबरोबरचा जुना हिशोब आहे.**










शेवटी हा क्रिकेटचा गेम आहे.







अकरा जणांच्या टीम मधल्या फ़क्त एकावरच टीका करणं योग्य नाही



भारतीय टीम मध्ये खेळणं हे माझं स्वप्न होतं पण त्याचं मी कधी दडपण येऊ दिलं नाही.



मी कधी **फ़ार पुढचा विचार करत नाही**. एकावेळी एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित करतो.






कोणीही व्यक्ती जेव्हा
बराच काळ क्रिकेट खेळते
तेव्हा ती एक स्वतःची
ओळख निर्माण करत
असते.



प्रत्येकच काळाचं काही स्वतंत्र महत्त्व असतं आणि प्रत्येक खेळाडू आणि कोचबद्दलही तसंच म्हणता येईल.





मला कधी काही सिद्ध करण्यात स्वारस्य नव्हतं. बॉलर एक स्टेटमेंट करतो आणि माझं काम असतं पुढे व्हायचं आणि भारतासाठी जास्तीत जास्त रन्स काढायचे.









मला हरायला आवडत नाही. क्रिकेट हे माझं पहिलं प्रेम आहे आणि एकदा मैदानात उतरलो की मी माझा रहात नाही. माझी विजयाची भूक सतत पेटलेली असते.










मी कधी तुलना करत नाही. ना काळांची, ना खेळाडूंची ना कोचेसची.











मी पुढे काय होणार याची ना चिंता करत, ना स्वतःवर एखाद्या टार्गेटचं दडपण येऊ देत.









मी स्वतःची तुलना कधीच कोणाशी करत नाही.









मी इतकी वर्षं खेळतो आहे आणि हे स्वप्नासारखं आहे.










मी खूप साधा विचार करतो. आला बॉल की बघायचं, ठरवायचं आणि खेळायचं.











मी ग्राउंडवरचे सहा तास अत्यंत गंभीरपणे देतो आणि परिणाम जो होईल तो स्विकारतो.









जर एक माणूसच भारताचं क्रिकेटमध्ये प्रतिनिधित्व करत असेल तर त्याला दोष द्या.



क्रिकेट हा सांघिक खेळ आहे ना? आधी हे स्पष्ट करा की क्रिकेट हा टीमचा खेळ आहे की एकेका खेळाडूचा.









इम्रान खान एका रात्रीत इम्रान खान झाला नाही. एक इतिहास बनायला खूप मेहनत करावी लागते.







माझं काम आहे देशासाठी रन्स मिळवणं. मी ते करणारच.







बॅट आणि बॉलच्या स्पर्शक्षणाला तुम्हाला आतून कळतं की ही सिंगल आहे की इतर काही. तो छोटासा स्पर्शक्षण महत्वाचा असतो.






माझ्या अख्ख्या आयुष्यात मी रनर घेतला नाही, अगदी शाळेपासून ते आजवर. कारण बॉल कुठे आणि किती जाणार ते फ़क्त मलाच माहित असतं, ते रनरला कसं कळणार?





माझं पहिलं धोरण असतं पहिल्या पाच सहा ओव्हरमध्ये विकेट न पडू देणं. पहिल्या दहा ओव्हर्स खूप महत्वाच्या असतात.





साहजिकच आहे, खुप दिवसांनंतर मैदानात उतरल्यावर खेळायची आणि खूप रन्स करायची खाज निर्माण होतेच.







असे फ़ार कमी खेळाडू असतील जे खेळाचा विचार करत नसतील.







मला विचाराल तर मी म्हणेन की मी क्रिकेट खेळतो आणि हा खेळ इतर कोणत्याही खेळाहून न लहान आहे ना मोठा.








मला एकदा गिटार शिकायची आहे. मला संगीत आवडतं आणि एकतरी वाद्य चांगलं वाजवायला शिकायचंय.





कॉलेजच्या कार्यक्रमात साडी नेसलेला सचिन

आम्ही इंग्लंडला नाटवेस्ट आणि श्री लंकेत हरवलं खरं पण तो एक मानसिक खेळ होता. त्यांनी आम्हाला वानखेडेवर दिलेल्या पराभवाचं उट्टं मला काढायचं होतं.










तुम्ही प्लान केल्याप्रमाणेच सगळं घडत जात नाही हे खरं. पण प्लान जर सर्व बाबी लक्षात घेऊन व्यवस्थित केलेला असेल तर प्रत्यक्ष मैदानात मदत होतेच.










आज इतक्या वर्षांनंतरही मी शांत झोपू शकत नाही कारण माझा मेंदू चौवीस काम करत असतो आणि माझी तयारी मी अशीच करतो.









मी पंधरा वर्षांचा असताना फ़र्स्ट क्लास क्रिकेटमध्ये उतरलो. सतत टेस्ट क्रिकेटर बनायचं स्वप्न पाहिलं. देशासाठी काहीतरी करायची इच्छा बाळगली. १९९५ साली लग्न केलं, दोन मुलं झाली. खूप छान चाललंय सगळं.





मी जेव्हा खेळाच्या विचारात असतो तेव्हा खेळाचाच विचार करतो. पण जेव्हा कुटुंबाबरोबर असतो तेव्हा जीवनाच्या त्या भागालाही तितकंच महत्त्व देतो.





क्रिकेट हे मला खूप खूप स्पेशल आहे. आताच्या माझ्या जीवनात येणाऱ्या कार्स आणि घरं आणि संपत्ती पेक्षाही मला क्रिकेट ची ती कॅप आणी भारताचा तो युनिफ़ॉर्म जास्त किंमतीचा आहे. या बाबतीत माझं बालस्वप्न खरं झालं आहे.








आपल्याला मुलं झाली की आपण पुन्हा आपल्या त्या सुंदर बालपणात जातो. माझी आताची मिनिट अन मिनिट महत्त्वाची असतात. पण मी स्वप्नं बघतो. स्वप्नांशिवायचं आयुष्य म्हणजे सपक, साचलेलं पाणी. मी रोज देवळात जातो असं नाही. पण प्रार्थना रोज करतो. मी देवाचे आभार मानतो. त्याने दिलेल्या प्रत्येक गोष्टीसाठी. आयुष्याने मला खरंच भरभरून दिलंय.















## नवज्योत सिंग सिद्धू यांनी सांगितलेली १९९८९-९० च्या पाकिस्तान दौऱ्याची गोष्ट.

(या दौऱ्यातच सचिन तेंडुलकरने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पाऊल टाकलं)

१९८९ चा पाकिस्तान दौरा.

पहिल्या तीन मॅचेस ड्रॉ झालेल्या.

चौथी मॅच सियालकोट. महंमद अली जीना स्टेडियम. ग्राऊंडवर गवताचं साम्राज्य. इम्रानखानने धमकीच दिली होती. जो गवत कापील त्याचा गळा कापीन. हेच शब्द. गळा कापीन! फ़ास्ट बॉलर्ससाठी पूर्ण इंतजाम करून ठेवलेला.

पहिल्या चार विकेट बाविस रन्सवर आटोपलेल्या. एकेक फ़ास्ट बॉल खांदा , कान, छाती असा वेध घेणारा. कुठून कसा यायचा आणि जायचा याचा पत्ताच लागत नव्हता. अंग, छाती माराने लाल झालेलं.  चार चार फ़ास्ट बॉलर्स. मॅचचा पाचवा दिवस. भारत बाविस रन्स वर चार विकेट. सत्यानाश.

माझं नुकतंच लग्न झालेलं. देवा. मी घरी हातीपायी धड जाईन ना? या जन्मी बायकोची भेट होईल ना? वाचव रे देवा. आउटच कर. यातून बाहेर पडायचा एकच मार्ग. आऊट होणं.

समोर रवी शास्त्री. मी बॅटिंग करतोय. वकारचा एक फ़ास्ट बॉल. मी वाकलो आणि वाचलो. रवी शास्त्री म्हणाला : “मस्त चुकवलास बॉल. छान खेळलास.”

मी म्हटलं : “अरे कसला छान! मला तर बॉल दिसलाच नाही.”

तो चडफ़डत आपल्या जागी गेला.

पुढची ओव्हर त्याला आली . बाउंसर. सपाक्. त्याच्या ग्लोव्हला लागून कॅच. गली अध्ये कॅच. आउट.

तो बडबडत बाहेर निघाला. : चर्चमध्ये जायला हवं होतं. यंव, त्यंव. मी मनात म्हटलं,: बेटा वाचलास. आउट झालास ते नशीब. मी स्वतः कधी आउट होतो याच्या आशेवर होतो. संकटातून कधी सुटेन.

आणि बघतो तर सचिन तेंडुलकर नांवाचा एक कोवळा पोरगा मैदानात येतोय. अर्र्. हे पोरगं तर बळीचा बकरा दिसतंय. बिचारा रे ! हा लगेचच जाईल. मग कोण ? कुंबळे वगैरे तर नांवालाच. सायकल स्टॅंडवर एक सायकलला धक्का दिला की सगळया धपाधप पडतात तसे हे सगळे गळणार. चला. रामनाम सत्य है म्हणायचं.




सचिन आला. सचिनला पहिला बॉल झूमकन आतून गेला. मी म्हटलं संपलं बिचाऱ्याचं. अरेरे.

दुसरा बॉल ऐतिहासिक होता. प्रचंड वेगाने आलेला सीझनचा बॉल सचिन हुक करायला गेला. बॅटची आतली कडा लागून बॉल आपटला तो थेट त्याच्या नाकावर. आणि बटाट्याची गोणी कोसळावी तसा सचिन धपाक्कन जमिनीवर कोसळला. थेट जमिनीवर. निपचित.

मी मनातल्या मनात म्हटलं : “मेलं बिचारं पोरगं. खलास”.

मी धावलो.

जवळ जाऊन बघतो तर नाक पुरतं फ़ुटलेलं. रक्ताच्या चिळकांड्यानी शर्ट भिजलेला.

मी ओरडलो : “स्टेचर! स्ट्रेचर!!”

मला हा वाचेल की नाही याचीच भिती. आणि समोर बघतो तर ढोल्या डॉ अली इराणी येत होता. त्याला बघून मी म्हटलं आता तर नक्की संपलंच. कारण अलीला फ़क्त दोनच औषधं माहिती. एक सारिडॉन आणि दुसरं बर्फ़ाची पिशवी. खरंच अली बर्फ़ाची पिशवी घेऊन येत होता.आता या बिचाऱ्या पोराचं काही खरं नाही.

हळहळत मी परत नॉन स्ट्रायकर एंडला निघालो. मनात म्हटलं : “चला आता हा तर संपलाच. आता तीन चार बॉलर येतील. मग खेळ खल्लास.”

तेवढ्यात मागून सचिनचा टिपिकल हलकासा आवाज आला. : “मै खेलेगा. मै खेलेगा.”

मी झर्रकन मागे वळलो. मी जे बघितलं ते आठवलं की आजही काटा उभा रहातो. नाकावरचा कापूस रक्ताने भरून खाली टपकत होता. शर्ट रक्ताळलेला. आणि अशा अवस्थेतला सचिन तेंडुलकर डॉ अली इराणीला हाताने ढकलत होता. “मै खेलेगा. मै खेलेगा. मै खेलेगा!!”

“अरे मै खेलेगा!”

मला जर इतकं लागलं असतं तर मी संध्याकाळी साडेपाच पर्यंत उठलोच नसतो.

तेव्हा मला धन्नकन जाणीव झाली. साला आपण अठ्ठावीस वर्षाचे सरदारजी पुरुष घाबरतो. आणि हा पंधरा सोळा वर्षाचा कोवळा पोरगा जीवाची बाजी लावून देशाचा विचार करतो. म्हणतो मै खेलेगा. याला म्हणतात देशप्रेम. मला लाज वाटली. मी बायकोला भेटण्याचा आणि स्वतःच्या जीवाचा विचार करतोय? झर्रकन मनात ठिणगीसारखा विचार आला


**वो भरा नहीं है भाव , बहती जिसमें रसधार नहीं**

**वो हृदय नहीं वह पत्थर है, जिसमें स्वदेशका प्यार नहीं.**

मी माझ्या झोपेतून खडबडून जागा झालो. भानावर आलो. माझ्यातला लढाऊ खेळाडू जागा झाला.

मला माहित होतं पुढचा यॉर्कर सचिनवर येऊन आदळणार. मी ते आधी भोगलं होतं. एक तर टाळकं फुटणार किंवा ढोपर. आम्ही सगळ्यांनी ते भोगलं होतं. गेल्या मॅचमध्ये मी, कपिल, कुंबळे सर्वांनाच हा प्रसाद या आधी मिळाला होता. आणि आता हे सोळा वर्षाचं पोरगं.

पुढचा बॉल. यॉर्कर. सचिन आधीच दोन पावलं मागे होऊन तयारीत उभा. १५० किमि च्या वेगाने बॉल आला. आणि सपाक्. सचिनच्या बॅटला लागून १८० किमि च्या स्पीडने माझ्या दोन ढेंगांच्या मधून सुसाट जाऊन समोरच्या बोर्डावर ठाण्णकन आदळला.



शांत !

सगळीकडे चिडिचूप.

अख्खा स्टेडियम अवाक.

पिन ड्रॉप सायलेंस.

फ़ोर.

खवळलेला वकार युनुस सचिनच्या दिशेने गेला.

त्याची खुनशी नजर. त्या भयंकर नजरेने माझ्यासारख्याच्या काळजाचं पाणी पाणी झालं असतं.

मी त्याच्या त्या तशा नजरेला नजर भिडवूच शकलो नसतो.

पण सचिन ने तशाही परिस्थितीत त्याच्या नजरेला नजर भिडवली.

आणि बोलला. काहीतरी बोलला.

जे बोलला ते मराठीत. मला मराठी येत नाही. तो काय बोलला त्याचा अर्थ मला आजही माहित नाही. मी कोणाला विचारलंही नाही. कारण त्याचा अर्थ किती भयंकर असेल याचा विचार करूनच मी घाबरतो. पण मराठी लोकांना ते कळेल म्हणून मी सांगतो.

सचिन बोलला. “बटर! बटर!! **तुझ्या आयचा घो**!!!”

काय झालं माहित नाही. कशामुळे झालं माहित नाही. सचिनच्या नजरेचा प्रताप असेल. पण वकार मागे वळला. आणि संपला. ढेपाळला.

नंतर घडलं तो इतिहास.

सगळे फ़ास्ट बॉलर ढेपाळले. त्या चौघांनाही आम्ही दोघांनी सपासप चोपले. ठोकले. हाणले.

त्या वेळी सचिन ने नाबाद सत्तावन्न रन्स ठोकले. नाबाद सत्तावन्न.

आणि संगतीचा परिणाम म्हणा किंवा काही म्हणा. मी सत्त्याण्णव रन्स दणादण ठोकले. नाबाद. माझ्या आयुष्यातली ती सर्वात मोठी भागीदारी. सातव्या विकेटसाठीचा जागतिक विक्रम. आजवर कोणीही न मोडलेला.

हा सचिनच्या शब्दांचा परिणाम होता. एखादा पराक्रम करण्यासाठी आधी तो मनातून ठरवावा लागतो. त्यावर विश्वास ठेवावा लागतो. स्वतःवर विश्वास ठेवावा लागतो. स्वतःच्या स्वप्नावर , कुवतीवर विश्वास ठेवावा लागतो.

धाडसाचा हा परिणाम असतो. एकाचं धाडस दुसऱ्याला शक्ती देतं.

# सचिन मी होणार,

सचिन मी होणार,
आई, सचिन मी होणार |
सवंगड्यांना सवे घेउनी, क्रिकेट मी खेळणार ||ध्रु.||

उंचावरुनी मारीन छक्के,
कुणी न झेली, ठाऊक पक्के,
धावांमागे जमवुनी धावा, डोंगर मी रचणार,
आई, सचिन मी होणार ||१||

आवड मजला चौकारांची,
ठोकीन शतके, मी धावांची,
आउट मजला करण्यासाठी, तारांबळ उडणार,
आई, सचिन मी होणार ||२||

धावांचे मी रचता किल्ले,
सोन्याचे मज मिळतील बिल्ले,
तरीही आई, मी न कधीही, गर्वाला शिवणार,
आई, सचिन मी होणार ||३||

कवी : उपेंद्र चिंचोरे

mail id. chinchoreupendra@yahoo.com

हे पुस्तक म्हणजे ना सचिन तेंडुलकर यांचे चरित्र ना त्यांच्या कामगिरीचा आढावा. तसं एक ई पुस्तक,

**“शतकाधीश”** हे लवकरच ई साहित्य प्रतिष्ठान आपल्यासमोर आणणार आहे.

कृपया आपली मागणी नोंदवा.

esahity@gmail.com

**विक्रमादित्य**

**संकलन आणि भाषांतर: श्री. सुनिल सामंत**

प्रकाशक :

ई साहित्य प्रतिष्ठान

G1102, Eternity

Thane

9869674820

©ई साहित्य प्रतिष्ठान®

या पुस्तकात घेतलेली चित्रे गुगलवरून घेतली आहेत. त्यांचे अधिकार त्या त्या फ़ोटोग्राफ़रकडे अबाधित आहेत.

सचिन तेंडुलकर यांची अवतरणे अधिकृत वेबसाईटवरून घेतली आहेत.

**http://tendulkar.co.in/index.php/sachin-tendulkar-quotes/**

नवजोतसिंग सिद्धू यांचा मूळ व्हिडिओ एकदा तरी पहाच.


http://www.youtube.com/watch?v=-3w4YOw5jKw

सचिन मी होणार या गीताचा व्हिडिओ एकदा पहायलाच हवा आणि मुलांना दाखवायलाच हवा.

गीतकार प्रा. उपेंद्र चिंचोरे ( काव्यांजली)

संगीतकार : मीना खडीकर

http://www.youtube.com/watch?v=FjN-97wmMMA&feature=share


BAS
TENDULKAR
10

# ई साहित्य प्रतिष्ठान

जगभर पसरलेल्या बारा कोटी मराठी भाषिकांना इंटरनेटवर जोडण्याचं एक स्वप्न. आज ना उद्या मराठी भाषा आणि मराठी भाषिक जगावर राज्य करतील हे स्वप्न. आणि मराठी माणसासारखा जिद्दी माणूस जगाच्या पाठीवर नाही हे वास्तव. मराठी भाषेसारखी गोड भाषा जगाच्या पाठीवर नाही हे वास्तव. सह्याद्रीच्या खडकांतून आणि कृष्णा कोयना गोदावरीच्या पाण्यातून आलेले हे गुण. या भाषेच्या साहित्याला उज्वल भविष्यकाळ आहे या विश्वासाने काम करणारी संस्था म्हणजे ई साहित्य प्रतिष्ठान.

२००८ पासून मराठी ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर सुमारे दोनशे ई पुस्तकांची निर्मिती केली. प्रत्येक अमूल्य पुस्तक सव्वा लाखभर लोकांपर्यंत विनामूल्य पोचवले. मराठी बाणा जपणाऱ्या उद्याच्या साहित्यिकांची ओळख संपूर्ण जगाला व्हावी म्हणून प्रयत्न केले. शिवाजी महाराजांपासून ते संत ज्ञानेश्वरांपर्यंत आणि कुसुमाग्रजांपासून ते महानोरांपर्यंत महान मराठी बाण्याचा जागर चालवला.

ई साहित्याची पुस्तके विनामूल्य मिळवण्यासाठी केवळ एक ई मेल पाठवा. आणि स्वतःचा आणि आपल्या मित्र आप्तांचा ई मेल आय डी रजिस्टर करा.

esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान®

www.esahity.com